**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Chhatrapati Sambhajinagar– 431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A+' Grade

Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
acadsection@bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
Email : dyregistrar.acad@bamu.ac.in

कार्यालय :- शैक्षणिक विभाग
(संलग्नीकरण)

# तातडीचे परिपत्रक

## छत्रपती संभाजीनगर ग्रामीण भागातील महाविद्यालयांना दिनांक २९-०९-२०२५ रोजी सुट्टी जाहीर करणेबाबत.

संदर्भ:-
१. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२०२५ कलम २५, ३० (२), (३), (५) व (१८)
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे शासन परिपत्रक दि. ०२-०८-२०१९
३. प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. २५-०९-२०२५ रोजी दिलेला इशारा
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. छत्रपती संभाजीनगर यांचा प्रस्ताव दि.२८-०९-२०२५
५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र जा.क्र.२०२५/जिआव्य/जि.नि.कक्ष/कावि-दि. २८-०९-२०२५. (वेळ सायं. ७:१०)
६. विद्यापीठाने मा. प्राचार्य छत्रपती संभाजीनगर ग्रुपवर दिनांक २८-०९-२०२५ सायं ८:१९ वाजता पाठविलेला तातडीचा संदेश.

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील **केवळ ग्रामीण भागातील महाविद्यालये** यांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी संदर्भ ५ अन्वये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील केवळ ग्रामीण भागातील महाविद्यालये, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा यांना दिनांक २९-०९-२०२५ रोजी संदर्भ २ नुसार सतर्कतेचा इशारा म्हणून सुट्टी जाहीर केली आहे.

याबाबत विद्यापीठाने संदर्भ ६ नुसार तातडीने महाविद्यालयांना प्राचार्य ग्रुपवर कळविले असून सदर पत्राद्वारे पुनश्च: छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महाविद्यालयाना दि. २९-०९-२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी सुट्टी जाहीर केल्याबाबत कळविण्यात येत आहे.

त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी, ही विनंती.

**संदर्भ क्र. शैक्ष/ संलग्न/पीबीजी/२०२५-२६/** 3570 ][
**दिनांक :- २९ सप्टेंबर, २०२५** ][
=A=

**उपकुलसचिव**
**(शैक्षणिक विभाग)**

**प्रतिलिपी :-**

१) **मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर याना माहितीस्तव अग्रेषित.

२) **कक्षाधिकारी, मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

३) **मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्वीय सहाय्यक, प्र कुलगुरु कार्यालय,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

४) **मा.सहसंचालक,** उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.

५) **अध्यक्ष/ सचिव,** सर्व संलग्नीत महाविद्यालय, (छत्रपती संभाजीनगर ग्रामीण विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

६) **जनसंपर्क अधिकारी,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

७) **संचालक,** युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देवून विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळाच्या परिपत्रक विभागात प्रसिद्ध करण्यात यावे, ही विनंती.

sd/-

**उपकुलसचिव**
**(शैक्षणिक विभाग)**

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
दुरध्वनी क्र.0240-2331077, फॅक्स - 2338394
Email-abdcoll@gmail.com abdrdcr@gmail.com ddmoaurangabad16@gmail.com


जा.क्र.2025/जिआव्य/जि.नि.कक्ष/कावि- दिनांक :28/09/2025

वाचा : 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम - 2005 कलम 25, 30 (2), (3), (5) व (18)
2. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे शासन परिपत्रक, दि. 02/08/2019
3. प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. 28 सप्टेंबर 2025 रोजी दिलेला इशारा.
4. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., छत्रपती संभाजीनगर यांचा प्रस्ताव, दि. 28/09/2025

# आदेश

**विषय :- दि. 29 /09/2025 रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील (महानगरपालिका क्षेत्र वगळून) सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करणे बाबत**

ज्याअर्थी, नमूद अनुक्रमांक 2 अन्वये हवामान विभागाच्या पूर्व सूचनेनुसार जिल्ह्यातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन संपूर्ण जिल्ह्यांकरीता अथवा जिल्ह्यातील ठराविक स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम - 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क्र. 2 मधील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या पूर्व सूचनेनुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यास उद्या दि. 29 सप्टेंबर 2025 रोजी यल्लो अलर्ट जारी केलेला असून जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व सिंचन प्रकल्प पूर्णपणे भरलेले असून सर्व नद्यांमध्ये पाण्याचा विसर्ग चालू आहे. तसेच दि. 28/09/2025 रोजी एकूण 68 मंडळांमध्ये अतिवृष्टी झाल्याकारणाने जिल्ह्यातील प्रमुख नद्यांनी इशारा पातळी गाठलेली आहे. तथापि, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये, याकरीता महानगरपालिका क्षेत्र वगळून जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालये (अंगणवाडी, पूर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालये) मधील विद्यार्थ्यांना दि. 29/09/2025 रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, **मी, दिलीप स्वामी भा.प्र.से. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्र वगळून जिल्ह्यातील इतर सर्व

अंगणवाडी, सरकारी / खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका शाळा, अनुदानित व विना अनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये, खाजगी शिकवणी यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्थांना दि. 29/09/2025, वार सोमवार रोजी सुट्टी जाहीर करीत आहे.

28/9/25

**दिलीप स्वामी भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर**

**प्रतिलिपी :**

1. मा. अपर मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई – 32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव सविनय सादर.
4. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
5. पोलीस अधीक्षक (ग्रामीण), छत्रपती संभाजीनगर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
6. उप विभागीय अधिकारी सर्व जि. छत्रपती संभाजीनगर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
7. शिक्षणाधिकारी प्राथमिक, माध्यमिक जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त महानगरपालिका क्षेत्र वगळून सर्व शाळांना सूचना द्यावी,
8. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
9. जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना प्रसिद्धीसाठी
10. संचालक, आकाशवाणी केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांना प्रसिद्धीसाठी